मातृभूमी - 17/7/25

# सायबर वॉरियर्स मोबाईल व्हॅनने सायबर सुरक्षा जनजागृती अभियानास प्रारंभ



। अकोला, दि. १६ ।

जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील प्रत्येक गावात जाऊन सायबर सुरक्षा जनजागृती अभियान राबविणे आणि वाढते सायबर गुन्हे कमी करण्याच्या उद्देशाने येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयातील सायबर वॉरियर्स मोबाईल व्हॅनचे उद्‌घाटन प्राचार्य डॉ. जे. एम. साबू आणि क्विक हील फाऊंडेशन पुणेच्या गायित्री केसकर, भौरदच्या सरपंच शिल्पा सरदार यांच्या हस्ते करण्यात आले. येथून जनजागृती अभियान सुरू करण्यात आले.

''सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा'' या उद्देशाने महाविद्यालयातील सायबर वॉरियर्स शीतल साखरे, नेहा टेरे, सानिका वाघमारे, शिक्षक समन्वयक डॉ. हरिदास खरात आणि गायत्री केसकर यांनी ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित कार्यक्रमात ग्रामस्थांना सायबर गुन्हे म्हणजे काय? हे गुन्हे किती प्रकारचे असतात, याविषयी मार्गदर्शन केले.यावेळी ई-केवायसी, पीक विमा, सबसीडी यासाठी कोणत्याही नवीन व्यक्ती जवळ आपले आधार कार्ड, पॅन कार्ड, इलेक्शन कार्ड, अंगठ्याचा ठसा खात्री केल्याशिवाय देऊ नये. तुम्हाला लॉटरी लागली, तुम्हाला कर्ज मंजूर झाले, एवढे पैसे भरा अशा मेसेजला प्रतिसाद दिल्यास कशी फसवणूक होते आणि यापासून आपण कसे सुरक्षित राहावे, याविषयी माहिती देण्यात आली. कळत न कळत जर आपण सायबर गुन्ह्यात अडकल्यास काय करावे, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली.


*** वेळ बदलली ***
चर्मरोग तज्ञ
**डॉ. अतुल सिंघानिया**, रतनलाल प्लॉट अकोला दवाखान्याची वेळ सकाळी ११ ते ४ पर्यंत. कृपया नोंद घ्यावी.
मो. ९४२३४२८४४३

**वॉटर प्रुफिंग/रिनोव्हेशन**
गजानन वॉटर प्रुफिंग लेखी गॅरंटी जिल्ह्यात कुठेही. विना तोडफोड संडास, बाथरुम, भिंत, सरदावा, पाणी टाकी, गच्ची क्रॅक फिलिंग, सिलर केमिकल्स प्रोसेस व चायनामोझाक, रेती, विटा फिनिशिंग, तुकाराम चौक,अकोला. सुनिल वाकोडे (१९९० पासून सेवेत)
मो. 9518943078,9422782147

**विकणे आहे**
बाराज्योतिर्लिंग मंदिराजवळ रणपिसे नगर, अकोला येथे
मुरलीधर टॉवर चौथ्या मजल्यावर